प्रकरण चार

महिला बालकल्याण विभाग (परिच्छेद क्रमांक 4.567 ते 4.580)

4.567 महिला बाल कल्याण विभाग अंतर्गत महिलांना साहित्य पुरविणे योजनेच्या खर्चाबाबत. (प्रकल्प-2) पंचायत समिती भिवंडी, जिल्हा ठाणे, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 18)

पंचायत समिती भिवंडी (प्रकल्प-2) महिला बाल कल्याण विभागात जिल्हा परिषद निधी अंतर्गत सन 2021-22 या वित्तीय वर्षात राबविण्यात आलेल्या योजनांच्या खर्चाबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 22, दिनांक 26/12/2022 दिले असता त्यास उत्तर अप्राप्त असल्याने सदरबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. विभागाने मंजूर केलेल्या वर्णनानुसार लाभार्थीनीने स्वत: वस्तू खरेदी केल्याची शहानिशा प्रकल्प स्तरावर करण्यात येईल या संबंधित साहित्य खरेदी करतानाचे श्रीमती सुलभा शिवराम जाधव यांचे तसेच इतर लाभार्थ्यांचे मूळ फोटो जोडले नाही.

2. साहित्य खरेदी बिलावर वस्तूचे स्पेसिफिकेशन नमूद केले नाही. तसेच श्रीमती वैशाली मुकणे यांनी अर्जासोबत साहित्य खरेदी केल्याबाबतचे बिल जोडले नाही. तसेच खरेदी केलेल्या घरघंटीची तांत्रिक क्षमता, वैशिष्टये, मशिनमध्ये उपलब्ध असणा-या सेवा-सुविधा इ.चा तपशिल देयकात नमूद नसल्याने स्पेसिफिकेशन्सची पुर्तता करणारे व योग्य त्या गुणवत्तेचे मशिन लाभार्थ्यांनी खरेदी केल्याची देयकांवरुन खात्री होत नाही.

3. श्रीमती वंदना सुधीर पाटील (सुपेगाव) यांना घरघंटीचा लाभ देण्यात आला आहे. परंतू सदर लाभार्थीनीचे नाव मंजूर लाभार्थी यादीत दिसून येत नाही. त्यामुळे अदा रक्कम रुपये 19,800/- वसुल करणे आवश्यक आहे.

4. महिला व बालविकास विभाग, जिल्हा परिषद ठाणे यांचे पत्र क्रमांक 19/05/2021 मधील योजनेच्या कार्यपद्धतीनुसार लाभार्थ्यास आवश्यकतेनुसार पाहिजे ती वस्तू खरेदी करण्याचे स्वातंत्र्य राहील तथापि देय होणारे अर्थसहाय्य हे वस्तू खरेदीची प्रत्यक्ष किमंतीच्या 90 टक्के रक्कम अथवा रुपये 30,000/- यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढेच अर्थसहाय्य अनुज्ञेय असेल सदर 3 लाभार्थ्यांनी ओमकार स्टील सेंटर यांजकडून प्रत्येकी रुपये 20,000/- ची पिको फॉल मशिन खरेदी केली आहे. त्यानुसार प्रत्येकी रक्कम रुपये 18,000/- प्रमाणे अनुदान देय असताना लाभार्थ्यांना प्रत्येकी 20,000/- प्रमाणे प्रमाणक क्रमांक 186 दिनांक 31/03/2022 अन्वये रक्कम अदा केली आहे. तरी जादा अदा रक्कम रुपये 6,000/- वसूल करणे आवश्यक आहे.

5. पिको फॉल मशिन खरेदीकरीता शासन मान्यता प्राप्त व्यावसायिक प्रशिक्षण पुरवठादारामार्फत अथवा इतर शासन मान्य संस्थामार्फत शिवणकाम प्रशिक्षण घेतल्याचे प्रमाणपत्र तसेच याबाबत बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी संस्था शासन मान्य असल्याचे प्रमाणित करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नाही.

6. वरील मुद्दा क्रमांक 4 मध्ये नमूद केलेप्रमाणे योजनेच्या कार्यपद्धतीनुसार लाभार्थ्यास आवश्यकतेनुसार पाहिजे ती वस्तू खरेदी करण्याचे स्वातंत्र्य राहील तथापि देय होणारे अर्थसहाय्य हे वस्तू खरेदीची प्रत्यक्ष किमंतीच्या 90 टक्के रक्कम अथवा रुपये 30,000/- यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढेच अर्थसहाय्य अनुज्ञेय असेल. सदर लाभार्थ्यांनी जय भवानी ट्रेडर्स यांजकडून रक्कम रुपये 27,000/- ची पापड मशिन खरेदी केली आहे. त्यानुसार अनुदान रक्कम रुपये 24,300/- देय असताना लाभार्थ्यांना रुपये 27,000/- अदा करण्यात आली आहे. त्यामुळे जादा अदा रक्कम रुपये 2,700/- संबंधिताकडून वसूल करणे आवश्यक आहे.

7. उक्त नमूद योजना संबंधित पात्र लाभार्थींच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये योजनेंतर्गत येणाऱ्या वस्तूची रोख रक्कम गट विकास अधिकारी यांचे मार्फत जमा करण्यात आवश्यक आहे. तथापि संबंधित लाभार्थींच्या खाती रक्कम प्रत्यक्षात जमा झालेबाबत पासबुक प्रत तपासणीस उपलब्ध झाली नाही.

4.568 10 टक्के सेस फंडातून इयत्ता 4 थी ते 10 वी च्या मुलींना स्वसंरक्षणासाठी ज्युडो कराटे प्रशिक्षणाबाबत.

पंचायत समिती धुळे, जिल्हा धुळे सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 13)

पंचायत समिती धुळे जिल्हा धुळे सन 2021-22 चे लेखापरीक्षणात पंचायत समिती सेस 10 टक्के महिला बालकल्याण मधून इयत्ता 4 थी ते 10 वी च्या मुलींना स्वरंक्षणासाठी जुडो कराटे प्रशिक्षणावर रक्कम रूपये 2,94,975/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2013/प्र.क्र.16/1, दिनांक 24.1.2024 मधील गट अ प्रशिक्षण व सक्षमीकरण ही योजना अ.क्र.2 नुसार मुलींसाठी असतांना व इच्छुक महिलांनाच प्रशिक्षण देणे आवश्यक असतांना 345 लाभार्थी यादीत 180 मुलांची नांवे समाविष्ट करुन योजनेचा लाभ् दिलेला आहे. सदर शासन नियमानुसार लाभ मुलांना देता येत नसल्याने (180 मुले X 950=171000/-) असा चुकीचा लाभ देवून खर्च नोंदविला आहे. तरी सदरची रक्कम वसुल करण्यात यावी व सदर योजनेचा लाभ चुकीच्या पध्दतीने दिल्याने 180 मुली लाभापासून वंचित दिसून आल्या.

2. शासन नियमाप्रमाणे ग्रामपंचायतचे शाळा व्यवस्थापन समितीची मान्यता घेतली नाही. प्रशिक्षण पूर्ण केल्याबाबतचे क्रिडा अधिकारी यांचे माणपत्र तसेच प्रशिक्षण कालावधीत बालविकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र घेतलेले दिसून येत नाही. प्रशिक्षण कालावधीत बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी प्रशिक्षण वर्गास भेट दिल्याबाबत व्हिजीट शेरा बुक उपलब्ध नाही.

3. आयकर अधिनियम 1961 चे कलम 194(जे) अन्वये टीडीएस 10 टक्के कपात करणे आवश्यक असताना कपातीचे चलन उपलब्ध न झाल्याने टीडीएस रक्कम रुपये 29,497/- वसुल करणे आवश्यक आहे.

4.569 जिल्हा परिषद सेस 10 टक्के निधी मधुन केलेल्या खर्चा बाबत.

पंचायत समिती पाथर्डी, जिल्हा अहिल्यानगर सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 11)

पंचायत समिती पाथर्डीने सन 2021-22 मध्ये जिल्हा परिषद सेस उपकर निधीतून अपंग महिलांना पल्पायझर मशीन, पाचवी ते दहावी मुलींना सायकल वाटप आणि अपंग महिलांना झेरॉक्स मशीन वाटप या योजनांचा समावेश केला असून त्यासाठी एकूण रक्कम रुपये 1,23,781/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. सायकल वाटप योजनेत रुपये 1,08,000/- इतका खर्च झाला असून सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक लोसंधो-2000/प्र.क्र.57/00/कु.क.1 दिनांक 9 मे, 2000 नुसार 'छोटे कुटुंब' संकल्पनेचे उल्लंघन करून, दोन पेक्षा जास्त अपत्ये असलेल्या सात विद्यार्थिनींना सायकलचा लाभ देण्यात आला आहे. त्यामुळे रक्कम रुपये 31,500/- नियमबाह्य झालेले प्रदान संबंधिताकडून वसूल करणे आवश्यक आहे.

2. अपंग महिलांना झेरॉक्स मशीन वाटप योजनेत रुपये 70,200/- इतका खर्च झाला असून योजनेच्या अटी व शर्ती लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने 2 लाभार्थ्यांना दिलेल्या लाभाबाबत खात्री करता येत नाही.

3. ग्रामविकास व जलसंधारणविभाग, शासन निर्णय क्रं. पंरास/1089/846/266/34 दिनांक 29/7/1989 अन्वये नुसार साहित्य वाटपानंतर फलश्रुती अहवाल सादर न करणे, महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक मागास - 1098/प्र.क्र.73/34 दिनांक 20/10/1999 नुसार दुबार लाभ टाळण्यासाठी लाभार्थ्यांची नोंदवही न ठेवणे, व ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक 1094/सीआर-2239/34/67 दिनांक 01/09/1993 नुसार सक्षम अधिकाऱ्यांकडून पाहणी अहवाल सादर न करणे, तसेच साहित्याचे स्पेसिफिकेशन बिलात नमूद नसणे, बँक पोहोच आणि लाभार्थी यादी उपलब्ध नसणे, योजनेच्या प्रचार-प्रसिद्धीबाबत कोणतीही कागदपत्रे उपलब्ध नसणे यासारख्या अनेक अनियमितता आढळून आल्या आहेत.

4.570 महिला व बाल कल्याण मधून महिलांना व्यवसायभिमुख वस्तू व जीवनावश्यक साहित्य पुरविणे योजणेअंतर्गत शिलाई मशीन पुरविणे थेट लाभ हस्तांतरण अनुदाना योजने बाबत (जिल्हा वार्षीक निधी विशेष घटक योजना)

पंचायत समिती दौंड, जिल्हा पुणे सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 10)

पंचायत समिती दौंड यांनी सन 2021-22 या वित्तीय वर्षातील महिला बालकल्याण महिलांना व्यवसायभिमुख वस्तू व जीवनावश्यक साहित्य पुरविणे योजनेवर रक्कम रुपये 2,49,750/- (37 लाभार्थी X 6,750/- प्रमाणे) खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक डीटीसीटी-2316/प्र.क्र.136/का1417 दिनांक 05/12/2016 च्या अनुक्रमांक 2 मधील अटींनुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच योजनेचे तांत्रिक मान्यता आदेश नस्ती सोबत जोडण्यात आले नाहीत.

2. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास/1080/सीआर/1074/57 दिनांक 29/09/1993 अन्वये फलश्रुती अहवाल प्राप्त करून घेण्यात आले नाहीत.

3. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास/1094/सीआर/2239/32 दिनांक 01/09/1993 व शासन निर्णय दिनांक 20/11/1999 मधील परिच्छेद 4 अन्वे गावनिहाय व योजना निहाय लाभार्थी नोंदवही ठेवली नाही.

4. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 20 नुसार निवड लाभार्थींना रक्कम मिळालेबाबत पोहच पावत्या जोडण्यात आल्या नाहीत.

5. उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-3/उद्योग-4 दिनांक 01/12/2016 मधील 2.9.3 मधील तरतुदीनुसार खरेदी समिती मार्फत दर निश्चिती बाबत कार्यवाही झालेबाबतचे अभिलेखे नस्ती सोबत जोडले नाहीत.

6. जिल्हा महिला बाल कल्याण विभाग पुणे यांनी निश्चित केलेले दरानुसारच पंचायत समिती स्तरावर खरेदी समिती मार्फत दर निश्चती बाबत कार्यवाही करण्यात आली नाही.

7. ग्रामविकास विभाग, शासन निर्णय झेडपीए-2013/प्र.क्र.76/पंरा-1 दिनांक 24/01/2014 मधील अनुक्रमांक 16 योजनेस व्यापक प्रसिद्धी व उत्पन मर्यादा यानुसार लाभ देणेबाबत कार्यवाही केली नाही.

8. ग्रामविकास विभाग, शासन निर्णय झेडपीए-2016/प्र.क्र.9/वित्त-9 दिनांक 19/05/2016 मधील अनुक्रमांक 1 नुसार प्रमाणे योजना अंमलबजावणी करिता काटेकोर नियोजन अनुक्रमांक 3 नुसार वैयक्तिक लाभाच्या योजनेकरिता विहित कालमर्यादेमध्ये लाभार्थी यांना लाभ देणेबाबत कार्यवही केलेली नाही.

9. लाभार्थी यांनी शिलाई मशीन चालविणे बाबत तांत्रिक प्रशिक्षण घेतले किंवा नाही याची पडताळणी केलेली नाही.

10. लाभार्थी अनुक्रमांक 25, 26, 34, 35 व 66 यांचे जातीचे दाखले संबंधित ल्राभार्थी मागणी अर्ज नस्ती सोबत जोडण्यात आले नाहीत.

11. लाभार्थी यांनी सादर केलेली देयके तपासणी केली असता त्यावर संबंधित शिलाई मशीन चे स्पेसिफीकेशन नमूद नसल्यामुळे योग्य स्पेसीफिकेशन नुसार वस्तू खरेदी केली असलेबाबत पंचायत समिती स्तरावर तपासणी केली नाही.

12. प्राप्त प्रस्तावावर आवक क्रमांक, दिनांक व मंजुरी क्रमांक नमूद नाही.

13. आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक 2000/प्र.क्र.57/00/कुक.1 दिनांक 09/05/2000 मधील राज्य लोकसंख्या धोरण निश्चिती सुचनेनुसार 2 अपत्य संकल्पनेचा स्वीकार केलेला असेल अशा लाभार्थींना लाभ

दिला असल्याची तपासणी पंचायत स्तरावर करण्यात आली नाही.

4.571 ग्रामीण भागातील महिलांना यांना व्यवसायभिमुख व जीवनावश्यक साहित्य पुरवठा करणे योजनेंतर्गत पीठ गिरणी खरेदीसाठी थेट लाभ देणे यामधील अनियमितताबाबत.

पंचायत समिती दौंड, जिल्हा पुणे सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 22)

पंचायत समिती दौड सन 2021-22 च्या लेखापरीक्षणात जिल्हा परिषद सेस निधीतुन महिलांना पिठाची गिरणी खरेदी करीता रक्कम रुपये 5,83,200/- अनुदान वाटप केलेबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक डीटीसीटी-2316/प्र.क्र.136/का1417 दिनांक 05/12/2016 च्या अनुक्रमांक 2 मधील अटींनुसार कार्यवाही करण्यात आली नाही.

2. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक परास/1080/सीआर/1074/57 दिनांक 29/09/1993 अन्वये फलश्रुती अहवाल प्राप्त करून घेण्यात आले नाहीत.

3. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक परास/1094/सीआर/2239/31 दिनांक 01/09/1993 व शासन निर्णय दिनांक 20/11/1993 नुसार गावनिहाय व योजना निहाय लाभार्थी नोंदवही ठेवली नसल्याने एकाच कुटुंबात दुबार लाभ दिलेबाबत पडताळणी करता आली नाही.

4. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 20 नुसार निवड लाभार्थींना लाभाची रक्कम मिळालेबाबत पोहच पावत्या जोडण्यात आल्या नाहीत.

5. उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस 2014/प्र.क्र.82/भाग-3/उद्योग-4 दिनांक 01/12/2016 मधील 2.9.3 मधील तरतुदीनुसार खरेदी समिती मार्फत दर निश्चिती बाबत कार्यवही झाले बाबतचे अभिलेखे नस्ती सोबत जोडण्यात आले नाहीत. तसेच 3.1.2.2. नुसार प्राप्त दरांचे व स्थानिक बाजारपेठेतील दरांचे सर्वेक्षण करणे आवश्यक असून त्यानुसार परिशिष्ट 1 मधील विहित प्रमाणपत्र देणे आवश्यक असताना अशी कार्यवाही करण्यात आली नाही.

6. ठराव क्रमांक 330 दिनांक 25/11/2021 नुसार पीठ गिरणी खरेदी दर रुपये 10,800/- ठरविण्यात आला आहे परंतु सदर दर निश्चिती बाबतचे अभिलेखे नस्ती सोबत जोडले नाहीत त्यामुळे दर निश्चिती बाबत योग्य ती खात्री लेखापरीक्षणास करता आली नाही.

7. ग्रामविकास विभाग, शासन निर्णय झेडपीए 2013/प्र.क्र.76/पंरा-1 दिनांक 24/01/2014 मधील अनुक्रमांक 16 योजनेस व्यापक प्रसिद्धी व उत्पन मर्यादेनुसार लाभ देणेबाबत कार्यवाही करण्यात आली नाही.

8. ग्रामविकास विभाग, शासन निर्णय झेडपीए 2016/प्र.क्र.9/वित्त-9 दिनांक 19/05/2016 मधील अनुक्रमांक 1 नुसार योजना अंमलबजावणी करिता काटेकोर नियोजन अनुक्रमांक 3 नुसार वैयक्तिक लाभाच्या योजनेकरिता विहित कालमर्यादेमध्ये लाभार्थी यांना लाभ देणेबाबत कार्यवही करण्यात आली नाही.

9. प्राप्त प्रस्तावावर आवक क्रमांक, दिनांक व मंजुरी क्रमांक नमूद नसल्याने लाभार्थी प्रस्तावाबाबत पडताळणी करता आली नाही

10. मंजूर लाभार्थी यादी नुसार लाभार्थी यांची नोंद ही लाभार्थी निवड ठराव इतिवृत्त मध्ये करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही करण्यात आली नाही त्यामुळे प्रत्यक्ष मंजूर लाभार्थी खात्री करता आली नाही.

11. जा.क्र.पंस/सक/मबाक/कावि/297/2021 दिनांक 20/12/2021 पूर्वसंमती पत्र मध्ये नमूद केलेप्रमाणे आवश्यक ती कागदपत्रे प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक असताना मुळ परिच्छेदात नमूद केलेप्रमाणे एकूण 5 लाभार्थी यांचे प्रस्तावासोबत शिधापत्रिका व पॅनकार्ड जोडलेले नसताना लाभ दिला आहे.

12. आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक-2000/प्र.क्र.57/00/कुक.1 दिनांक 02/05/2000 मधील राज्य लोकसंख्या धोरण निश्चिती सुचनेनुसार 2 अपत्य संकल्पनेचा स्वीकार केला असेल अशा लाभार्थींना लाभ

दिला असल्याची तपासणी पंचायत स्तरावर करणेची कार्यवाही करण्यात आली नाही.

4.572 विशेष घटक योजनेअंतर्गत अनुसुचीत जाती महिलांना जीवनावश्यक साहित्य पुरविणे योजनेतील अनियमिततेबाबत. (पीठगिरणी/ सोलार वॉटर/शिलाई मशिन)

पंचायत समिती जुन्नर, जिल्हा पुणे सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 4)

पंचायत समिती जुन्नर यांनी सन 2021-22 चे विशेष घटक योजनेअंतर्गत महिलांना जीवनावश्यक साहित्य पुरविणे (पीठगिरणी/ सोलार वॉटर/शिलाई मशिन) योजनेअंतर्गत रक्कम रुपये 18,13,523/- इतके अनुदान वाटप केले आहे. सदर नस्तीचे लेखापरीक्षण केले असता आढळलेल्या अनियमिततांबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. सन 2020-21 मधील पीठगिरणी 110 लाभार्थी ठी अनुदान प्राप्त झालेले असताना 21 लाभार्थींना आणि शिलाई मशिन साठी एकूण 12 लाभार्थींकरिता अनुदान प्राप्त असताना 0 लाभार्थींना लाभ देण्यात आला आहे. तसेच सन 2021-22 मधील सोलार वॉटर 10 लाभार्थीसाठी अनुदान प्राप्त असताना 1 लाभार्थीला, शिलाई मशिन 20 लाभार्थीसाठी अनुदान प्राप्त असताना 6 लाभार्थींना व पिठ गिरणी 233 लाभार्थीसाठी अनुदान प्राप्त असताना 151 लाभार्थींना लाभ देण्यात आला आहे. त्यामुळे सन 2020-21 मधील पिठगिरणीचे 89 लाभार्थी, शिलाई मशिनचे 12 लाभार्थी व सन 2021-22 मधील सोलार वॉटरचे 9 लाभार्थी, शिलाई मशिनचे 14 लाभार्थी व पिठगिरणीचे 82 लाभार्थी असे सन 2020-21 व सन 2021-22 मधील एकूण 206 लाभार्थी लाभापासून वंचित राहिले असल्याने सदर योजनेचा उद्देश सफल झाला नाही.

2. ग्रामीण भागातील महिलांना पीठगिरणी पुरविणे योजनेसाठी सन 2020-21 साठी एकूण प्राप्त अनुदान रक्कम रुपये 10,89,000/- पैकी रुपये 2,07,900/- इतका खर्च झाल्याने रुपये 8,81,100/- इतकी अखर्चित व शिलाई मशिनसाठीची रुपये 78,840/- पैकी काहीही खर्च नाही अशी एकूण रक्कम रुपये 9,59,940/- इतकी अखर्चित रक्कम दोन वर्षावरील असल्याने व दिनांक 31/03/2022 अखेर खर्च न केल्याने शासनास भरणा करणे आवश्यक आहे.

3. प्रमाणक क्रमांक 82 व 83 दिनांक 31/03/2022 अन्वये मंजूर लाभार्थी यादीतील लाभार्थी क्रमांक 79 - मंदा अकुंश माळवे व 108 - सत्यभामा आत्माराम धोत्रे या लाभार्थ्यांना प्रत्येकी रुपये 10,800/- प्रमाणे एकूण रक्कम रुपये 21,600/- दुबार अदा झाली असल्यामुळे वसुली करणे आवश्यक आहे.

4. प्रमाणक क्रमांक 83 दिनांक 31/03/2022 नुसार अनुदान अदा केलेल्या लाभार्थीपैकी मंजूर लाभार्थी यादीतील अनुक्रमांक 120, 121, 135, 171 व 202 असे एकूण 5 लाभार्थी यांचे आधार कार्ड पाहता सदर लाभार्थी हे संबंधित ग्रामीण भागातील रहिवासी असल्याचे दिसून येत नसल्याने त्यांना अदा केलेल्या लाभाची रक्कम रुपये 10,800 x 5 = 54,000/- वसूल करणे आवश्यक आहे.

5. प्रमाणक क्रमांक 80 दिनांक 31/03/2022 नुसार शिलाई मशिनसाठी अनुदान दिलेल्या लाभार्थ्यांपैकी मुळ परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे 5 लाभार्थींच्या प्रस्तावामध्ये शिवणकाम सर्टिफिकेट आढळले नाही.

4.573 महिला व बालकल्याण विभागाच्या 10 टक्के राखीव निधीतून सर्वसाधारण घटकांतील महिलांना शिवणयंत्र पूरविणे, पिठाची गिरण व सायकल खरेदी अनुदान वाटपातील अनियमिततेबाबत. (जिल्हा परिषद सेस)

पंचायत समिती गगनबावडा, जिल्हा कोल्हापूर सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 7)

पंचायत समिती गगनबावडा यांनी सन 2021-22 मध्ये जिल्हा परिषद स्वीयनिधीमधून 10 टक्के महिला व बाल कल्याण अंतर्गत सर्वसाधारण घटकांतील महिलांना शिवणयंत्र पूरविणे, पिठाची गिरण व सायकल

खरेदी या करीता एकूण रुपये 88,120/- अनुदान पुरविणेत आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. योजनांसाठी प्राप्त प्रस्तावांची पडताळणी केली असता, पंचायत समितीस सदर प्रस्ताव कधी प्राप्त झाला आहे याबाबतचे आवक क्रमांक व दिनांक प्रस्तावावर नोंदविण्यात आले नाहीत.

2. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक/माजव/2018/प्र.क्र.348/3दिनांक 20/12/2018 अन्वये योजनेचे सर्व प्रकारे प्रसिध्दी देवून त्याद्रवारे प्राप्त अर्जातून प्राधान्य क्रमाने लाभार्थी निवड होणे आवश्यक असताना पंचायत समितीने व्यापक प्रसिध्दी केल्याबाबत खात्री करता आली नाही.

3. शिवणयंत्र पुरविणे लाभार्थी प्रस्ताव पडताळणी केली असता शिवणकाम प्रशिक्षण घेतलेबाबतचा दाखले प्रस्तावासोबत जोडणेत आले नाहीत.

4. लाभार्थी प्रस्तावासोबत साहित्य खरेदी बाबतचे वॉरंटी कार्ड जोडलेले नाही.

5. सायकल खरेदी लाभार्थी प्रस्तावासोबत सायकल खरेदीचे छायाचित्र नस्तीसोबत जोडली नाहीत.

6. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1094/सीआर/2239 दिनांक 01/09/1993 नुसार फलश्रुती अहवाल घेणेत आला नाही.

7. ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1089/प्र.क्र.55/34 दिनांक 05/10/1989 अन्वये वैयक्तिक लाभ देण्यात आलेल्या लाभार्थ्यांचे मास्टर नोंदवही वर्षनिहाय व गावनिहाय ठेवणेत आली आहे परंतु ती अपुर्ण असल्याने एकाच लाभार्थ्यास दुबार लाभ दिला गेला नसल्याची तपासणी करता आली नाही.

4.574 इयत्ता 7 वी ते 12 वी पास मुलींना संगणक प्रशिक्षण यासाठी झालेल्या खर्चाबाबत.

(पंचायत समिती उपकर)

पंचायत समिती आजरा, जिल्हा कोल्हापूर सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 14)

महिला बाल कल्याण विभाग यांनी सन 2021-22 मध्ये पंचायत समिती सेस मधून इयत्ता 7 वी ते 12 वी पास 10 मुलींना एकूण रुपये 20,000/- संगणक प्रशिक्षण अनुदान वितरीत केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. पंचायत समितीची पत्र क्रमांक पंसआ/वशि/226/2022 दिनांक 10/01/2022 अन्वये महिला व बालकल्याण विभागाने रुपये 20,000/- अनुदान वितरीत केले आहे. लाभार्थ्यांनी सदर योजनेचा लाभ अन्य विभागाकडून घेतला नसल्याचे प्रमाणपत्र सादर करण्यात आले नाही.

2. प्रशिक्षण संस्थेकडे प्रशिक्षण घेत असलेल्या मुलींची हजेरी पत्रके सादर करण्यात आली नाहीत.

3. संगणक परीक्षा प्रशिक्षण पुर्ण केलेनंतर पास झालेची प्रमाणपत्रे प्रस्तावासोबत जोडली नाहीत.

4. संगणक परीक्षा प्रशिक्षण 10 मुलींना शासनाचे इतर योजनांतून लाभ दिला आहे किंवा कसे याबाबत लाभार्थी मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

5. योजनेतील नियम व अट क्रमांक 4 नुसार लाभार्थी सन 2019-20 व 2020-21 या वर्षात प्रशिक्षण पूर्ण झालेले असणे आवश्यक असताना काही लाभार्थ्यांनी प्रशिक्षण सन 2021-22 मध्ये घेतलेचे दिसून येते.

6. उपरोक्त योजनेतील लाभार्थ्यांचे प्रस्तावांवर बाल विकास प्रकल्प अधिकारी व गट विकास अधिकारी पंचायत समिती आजरा यांची अनुक्रमे शिफारस व स्वाक्षरी नाही.

7. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 20 नुसार संबंधित लाभार्थ्यांच्या रकमा प्राप्त झाल्याबाबत पोहोच पावत्या लेखापरीक्षणास प्राप्त झाल्या नाहीत.

4.575 लाभार्थ्यांनी सादर केलेले प्रस्ताव व त्यावरील केलेल्या कार्यवाहीतील त्रुटींबाबत.

पंचायत समिती गडहिंग्लज, जिल्हा कोल्हापूर सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 17)

पंचायत समिती गडहिंग्लज यांनी सन 2021-22 मध्ये महिला व बालविकास विभागांतर्गत विविध

योजनाखाली मुळ परिच्छेदातील तपशीलानुसार एकूण 69 पात्र लाभार्थी पैकी 53 लाभार्थ्यांना लाभ दिला असून एकूण रक्कम रुपये 5,00,130/- इतके अनुदान खर्च केले आहे. योजनांसाठी प्राप्त प्रस्तावांची तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. कार्यालयास प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांची नोंदवही ठेवली नसल्याने विहीत कालावधीत ते प्राप्त झाल्याची खात्री करता येत नाही. तसेच यादीचे अवलोकन केले असता दारीद्रय रेषेखालील अगदी नगण्य लाभार्थ्यांना लाभ दिलेचे दिसुन येते.

2. लाभार्थ्यांना त्यांची निवड झालेबाबत लेखी निवडपत्र देवुन कळविणे आवश्यक असताना तसे कळविलेबाबत निवड पत्र, जावक नोंदवहीतील नोंद यांसारखे अभिलेख सादर केले नाहीत.

3. स्पेसिफिकेशबाबतचा तांत्रिक अधिकारी यांचा अहवाल घेतला नसल्याने स्पेशिफिकेशन पेक्षा कमी दर्जाचे साहित्य घेतले किंवा कसे याचा बोध होत नाही.

4. ग्राम विकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास/1080/सी.आर.1074/57 दिनांक 29/09/1993 अन्वये फलश्रृती अहवाल प्राप्त करुन घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केली नाही.

5. ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/1094/सीआर/2239/31 दिनांक 01/09/1993 व शासन निर्णय क्रमांक मागास/1094/सीआर/2239/34 दिनांक 20/10/1999 मधील परिच्छेद 4 अन्वये विहित केलेल्या नमुना प्रपत्र अ-1 मध्ये गावनिहाय, योजनानिहाय व वर्षनिहाय लाभार्थी नोंदवही ठेवली नसल्याने एकाच कुटुंबात दुबार लाभ दिला किंवा कसे याची खात्री करता आली नाही.

6. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 20 नुसार लाभार्थींना रक्कमा प्राप्त झाल्या बाबत मुद्रांकित पोहच पावत्या सादर करण्यात आल्या नाहीत.

7. प्रस्तावावर महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी यांची स्वाक्षरी/शिफारस नाही. तसेच शासन मान्यता प्राप्त शिवण क्लास पूर्ण केले नसतानाही लाभार्थ्यांना लाभ दिला आहे.

8. वस्तु खरेदी केल्याचा पुरावा म्हणुन खरेदी केलेल्या वस्तुसह लाभार्थ्याचा फोटो जोडलेला नाही.

9. ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2016/प्र.क्र.9/वित्त-9 दिनांक 19 मे 2016 चे अनुक्रमांक 1 अन्वये योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा परिषदेने काटेकोर नियोजन करणे, अनुक्रमांक 3 नुसार प्राप्त निधी विहीत निकषानुसार व कालमर्यादेत खर्च होऊन लाभार्थ्यांना वेळेत लाभ मिळेल याची जबाबदारी जिल्हा परिषदेची आहे. परंतु शासन निर्णयानुसार कार्यवाही न झाल्याने लाभार्थ्यांच्या खात्यावर उशीरा रकमा प्राप्त झाल्या आहेत.

4.576 पंचायत समिती सेस निधी मधुन महिलांना शिलाई मशीन खरेदीबाबत लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात थेट अनुदान वितरण खर्चातील अनियमिततताबाबत.

पंचायत समिती धामणगांव रेल्वे, जिल्हा अमरावती सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 2)

पंचायत समिती सेस मधून सन 2021-22 मध्ये महिला व बालकल्याण विभाग अंतर्गत राबविलेल्या महिलांना शिलाई मशीन खरेदीसाठी लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात थेट अनुदान वितरण करणे योजनेवर रक्कम रुपये 92,000/- खर्च केला आहे. यामधील अनियमिततांबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. मुंबई ग्राम पंचायत अधिनियम 1958 चे कलम 7 पोट कलम 8 नुसार जिल्हा परिषद व पंचायत समिती मार्फत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तीक लाभाच्या योजनांची अंमलबजावणी करताना लाभार्थ्याची निवड ही ग्राम सभेच्या शिफारशीने होणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. तसेच मुलींना व महिलांना शिलाई मशीन खरेदी बाबत लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात थेट अनुदान वितरण योजनेची ग्राम पंचायत स्तरावर व्यापक प्रसिध्दी दिलेबाबत अभिलेख उपलब्ध झाले नाही.

2. ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक-झेडपीए-2016/प्र.क्र.9/वित्त9 दिनांक 19 मे 2016 नुसार वैयक्तीक लाभाच्या योजनेचे काटेकोरपणे नियोजन केल्याचे दिसून आले नाही.

3. नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक डीटीसी-2316/प्र.क्र.133/का.1417 दिनांक 05 डिसेंबर 2016 नुसार पंचायत विभागाने सदर लाभार्थ्यांने सादर केलेल्या बिलांची सखोल चौकशी करुन तसेच खरोखर शिलाई मशीन खरेदी केल्या बाबत खातरजमा केल्या नंतरच अनुदानाचे वितरण करणे आवश्यक आवश्यक असताना अशी कार्यवाही केली नाही.

4. लाभार्थ्यांनी शिलाई मशीन खरेदी केल्या नंतर पंचायत समितीने अनुदानाची रक्कम लाभार्थ्यांच्या खात्यावर वितरीत केल्याबाबत लाभार्थ्यांची यादी लेखा परिक्षणाला उपलब्ध करुन देण्यात आली नाही.

5. सुवर्णा एस. ढाणके, यांचे अर्जाची पडताळणी केली असता अर्ज दिनांक 23/12/2021 असून जन्म तारीख 21/04/1971 नमुद आहे. सदर योजना 18 ते 50 वयाच्या महिलांकरिता असून लाभार्थ्याचे वय 50 पेक्षा जास्त असल्याचे दिसून आले. अपात्र अर्जदारास लाभ दिल्याचे स्पष्ट झाल्याने प्रदान रक्कम रुपये 5,000/- वसुल करणे आवश्यक आहे.

6. योजनेतील 3 लाभार्थो यांचे खरेदी बिल दिनांक 30/03/2022 म्हणजे लाभ दिल्यानंतरचे असल्याने सदर लाभार्थी अपात्र असल्याचे दिसून आल्याने प्रदान रक्कम रुपये 15,000/- वसुल करणे आवश्यक आहे.

4.577 पंचायत समिती सेस निधीमधुन महिला व बालकल्याण निधी अंतर्गत ग्रामीण भागातील मागासवर्गीय महिला लाभार्थ्यांना शिलाई मशीन खरेदी करीता थेट 90 टक्के अनुदान वितरीत करणे खर्चातील अनियमितता.

पंचायत समिती अकोला, जिल्हा परिषद अकोला सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 4)

पंचायत समिती अकोला, यांनी सन 2021-22 मध्ये पंचायत समिती सेस निधीतुन 10 टक्के महिला व बालकल्याण योजनेंतर्गत ग्रामीण भागातील महिला लाभार्थ्यींना90 टक्के अनुदानावर शिलाई मशीन खरेदी करीता रुपये 4,545/- प्रतिलाभार्थी प्रमाणे 51 लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी एकूण रुपये 2,31,795/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. मुंबई ग्राम पंचायत अधिनियम 1958 चे कलम 7 पोट कलम 8 नुसार जिल्हा परिषद व पंचायत समिती मार्फत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तीक लाभाच्या योजनांची अंमलबजावणी करताना, लाभार्थ्यींची निवड ही ग्राम सभेच्या शिफारशीने केल्या बाबतचा ठराव लाभार्थ्याच्या अर्जासोबत नाही.

2. ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2016/प्र.क्र.9/वित्त-9 दिनांक 19 मे 2016 नुसार वैयक्तीक लाभाच्या योजनेचे काटेकोरपणे नियोजन करणे व निधी नियमानुसार खर्च करणे आवश्यक आहे. अशी कार्यवाही केली नाही.

3. ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2013/प्र.क्र.76/पंरा-1 दिनांक 24 जानेवारी 2014 नुसार पात्र लाभार्थ्यांमध्ये 5 टक्के अपंग लाभार्थ्यांना लाभ देणे आवश्यक आहे. परंतु विभागाने 5 टक्के अपंग लाभार्थ्यांना लाभ दिल्याचे दिसून आले नाही.

4. पंचायत समितीने योजनानिहाय लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवली नाही. त्यामुळे मागील वर्षीच्या लाभार्थ्यांना सदर योजनेचा दुबार लाभ देण्याची शक्यता नाकारता येत नाही.

5. एकुण 113 लाभार्थ्यांची निवड केली असताना योजनेवर करण्यात आलेली अंदाजपत्रकीय तरतुद शिल्लक असताना 51 लाभार्थ्यांना लाभ दिलेला आहे. त्यामुळे 62 पात्र लाभार्थी लाभा पासुन वंचीत राहील्याचे दिसून आले.

6. लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर लाभाची रक्कम जमा करण्याकरीता धनादेशा सोबत बँकेत सादर केलेली लाभार्थ्यांच्या बँक खाते निहाय, रक्कमा निहाय बँकेने प्रमाणित केलेली यादी लेखापरीक्षणाला उपलब्ध झाली नाही. त्यामुळे लाभार्थ्यांच्या खात्यात रकमा जमा झाल्याबाबत खात्री करता आली नाही.

7. लाभार्थ्याचे शिलाई मशीन खरेदी केल्याबाबतचे फोटो शिलाई मशीन तपासणी अहवालासोबत दिसून आले नाही.

4.578 जिल्हा परिषद उपकरातून महिला बालकल्याण विभागांतर्गत महिलांकरीता शिलाई मशिन पुरविणे व शिलाई मशिन प्रशिक्षण या राबविण्यात आलेल्या योजनेवर झालेल्या खर्चातील अनियमिततेबाबत.

पंचायत समिती वाशिम, जिल्हा परिषद वाशिम, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 4)

पंचायत समितीने सन 2021-22 मध्ये जिल्हा परिषद उपकरामधुन वैयक्तीक लाभाच्या योजना राबविल्या असुन त्यामध्ये महिला व बालकल्याण विभागांतर्गत 90 टक्के सुटीवर शिलाई मशिन खरेदीकरीता व शिलाई मशिन प्रशिक्षणाकरीता रक्कम रुपये 2,82,864/- लाभार्थ्यांना वितरीत केले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. अर्जाची नोंदवही ठेवण्यात आली नसल्याने किती लाभार्थ्यांचे अर्ज प्राप्त झाले, किती नामंजुर झाले याबाबत खात्री करता आली नाही.

2. ज्या लाभार्थ्यांना शिलाई मशिन खरेदीकरीता अनुदान वितरीत केले त्यांची गावनिहाय नोंद मास्टर नोंदवहीत घेणे आवश्यक आहे. परंतु मास्टर नोंदवही ठेवली नसल्यामुळे सदर लाभार्थ्यांना यापुर्वी या योजनेतुन किंवा इतर योजनेतुन लाभ देण्यात आला किंवा कसे? याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही.

3. सदर योजनेबाबत व्यापक प्रसिध्दी दिल्याबाबतचे अभिलेखे नस्तीसोबत दिसून येत नाहीत.

4. निवड यादी नुसार शिलाई मशिन खरेदीकरीता एकुण 83 लाभार्थ्यांची निवड केल्याचे आढळुन येते. प्रशासकीय मंजुर रक्कम पुरेशी असतांना फक्त 45 लाभार्थ्यांना सदर योजनेचा लाभ दिल्याने उर्वरीत लाभार्थी या योजनेपासुन वंचित राहील्याचे आढळुन येते. तसेच निवड यादीतील प्राधान्यक्रमाने लाभ न देता निवड यादीतील सुरुवातीच्या लाभार्थ्यांना वगळुन शेवटच्या लाभार्थ्यांना लाभ दिला आहे.

5. यादीनुसार लाभार्थ्यांचे नावाने बँकेच्या खात्यात रक्कमा जमा केल्याचे नमुद आहे. परंतु सदर यादीवर बँकेचा सही व शिक्का आढळला नाही. त्यामुळे सदर रक्कम संबंधीत लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा झाल्याची खात्री करता आली नाही.

6. शिलाई मशिन प्रशिक्षणाकरीता प्रशासकीय व तांत्रिक मंजुरीचे आदेश आहेत परंतु त्यावर सक्षम प्राधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही.

4.579 एकात्मिक बाल विकास सेवा योजना अंतर्गत (एस.सी. व एस.टी.) प्रवर्गातील महिलांना पिकोफॉल मशीनीकरीता अनुदान वाटपाबाबत.

पंचायत समिती मौदा, जिल्हा नागपूर, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 1)

पंचायत समिती मौदा यांनी सन 2021-22 मध्ये जिल्हा परिषद सेस निधीतून एकात्मिक बाल विकास सेवा योजना अंतर्गत (एस.सी. व एस.टी.) प्रवर्गातील महिलांना पिकोफॉल मशीनीकरीता 90 टक्के अनुदान देणे अंतर्गत एकुण 4 प्रमाणकाव्दारे 38 लाभार्थ्यांना एकूण रक्कम रुपये 2,45,727/- वाटप केले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. पिको फॉल शिवणयंत्राकरीता प्रत्येक लाभार्थ्याला 90 टक्के अनुदान रक्कम रुपये 6,471/- वाटप केले आहे. परंतु 31 लाभार्थ्यांचे देयक कमी रकमेचे असताना सुध्दा तेवढीच रक्कम प्रदान केल्यामुळे एकूण 31

लाभार्थ्यांची मिळून रुपये 4,971/- चे झालेले जादा वाटप संबंधितांकडून वसूल करणे आवश्यक आहे.

2. अनुदान वितरण आदेशातील अट क्रमांक 13 अन्वये संपूर्ण निकष पूर्ण करीत असलेल्या पात्र लाभार्थींना वस्तु/ साहित्य खरेदीकरीता निवडीचे पत्र देण्यात यावे. संबंधित लाभार्थ्यांनी निवडीचे पत्र मिळाल्यापासून दिनांक 31.03.2022 चे आत मंजुर स्पेसिफिकेशन प्रमाणे साहित्याची खरेदी करुन टॅक्स इनवाईस पक्के देयक सादर करावे असे स्पष्ट नमूद असताना 4 लाभार्थ्यांनी दिनांक 31.03.2022 ला खरेदी केली असता लाभ प्रदान केला आहे. तसेच लाभार्थ्यांनी हस्तलिखित देयके सादर केली असता मंजुर केली आहेत.

3. अनुदान वितरण आदेशातील अट क्रमांक 8 अन्वये वस्तु/ साहित्य खरेदी केल्याबाबत पडताळणी पर्यवेक्षीय कर्मचारी यांनी करावी. वस्तु विहीत परिमाणाप्रमाणे असल्याची खात्री पडताळणी यंत्रणेने केल्यानंतर रोख स्वरुपातील लाभ देण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात यावी. असे असताना लाभार्थ्यांच्या देयकावरील पिको फॉल मशीनचे नाव व देयकासोबत संलग्न मशीनचे फोटो यामध्ये तफावत असल्याचे दिसून आले.

4. ग्रामविकास व जलसधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9/ दिनांक 20 जून 2008 परिशिष्ट ई नुसार विहीत मुदतीत योजना राबविणे बाबत निर्देश असताना, विहीत मुदतीत योजना राबविलेली नाही. जिल्हा परिषदेने लाभार्थी मंजुर करुन लाभार्थ्यांची मंजुर यादी पंचायत समितीकडे सादर केली असताना माहे मार्च अखेर कार्यवाही केली नसल्याने एकुण 21 लाभार्थी लाभापासून वंचित राहिले आहे.

5. ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक 1089/प्र.क्र./55364/ दिनांक 5 ऑक्टोबर 1989 नुसार लाभार्थीची मास्टर नोंदवही ठेवून लाभार्थीस दुबार लाभ दिला नसल्याची शहानिशा करता आली नाही.

6. ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास/1089/646/34 दिनांक 29 जुलै 1989 नुसार योजनेचे मुल्यमापन करुन फलश्रृती अहवाल सादर करणेबाबत निर्देश असताना त्यानुसार कार्यवाही केली नाही.

4.580 महिला व बालकल्याण विभागाचे किरकोळ रोखपुस्तक व अशासकीय रोखपुस्तकातील अनियमिततेबाबत.

पंचायत समिती धानोरा, जिल्हा गडचिरोली, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 26)

पंचायत समिती धानोरा यांचे सन 2021-22 वर्षाचे लेखापरीक्षणामध्ये महिला व बालकल्याण विभागाचे किरकोळ व अशासकीय रोख पुस्तकाची तपासणी केली असता आढळुन आलेल्या अनियमिततांबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. किरकोळ रोख पुस्तकामध्ये दिनांक 15/04/2021 रोजी नोंदविलेला खर्च रक्कम रुपये 10,400/- व दिनांक 24/05/2021 रोजी नोंदविलेला खर्च रुपये 1,840/- व 12,180/- बाबत खर्चाची प्रमाणके सादर न केल्याने सदर एकुण खर्च रक्कम रुपये 24,420/- लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

2. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 चे नियम क्रमांक 56 नुसार सर्व खर्चाची नोंद रोख वहीच्या प्रदान बाजुकडे कालक्रमानुसार अनुक्रमांक देऊन तपशीलवार नोंदविणे आवश्यक असताना एकुण खर्च रुपये 24,420/- बाबत रोख पुस्तकामध्ये खर्चाचा तपशील, प्रमाणक क्रमांक नोंदविलेला नसल्याने सदर खर्चाबाबत लेखापरीक्षणात पडताळणी होऊ शकली नाही.

3. माहे मार्च 2022 अखेर रक्कम रुपये 32,959/- विभाग स्तरावर शिल्लक असल्याचे दिसुन येते. रोख पुस्तकातील सुरुवातीची शिल्लक व अखेरच्या शिल्लक रकमेचा गोषवारा रोख पुस्तकामध्ये नोंदवला नाही.

4. अशासकीय रोख पुस्तकातील दिनांक 24/05/2021 रोजी आयकर कपात रक्कम रुपये 3,52,983/- शासन खाती भरणा केल्याचे नमुद असुन तपासणी करीता सदर चलन मागणी करुनही सादर न केल्याने सदर खर्च लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

*****